# टी.वाय. बी .ए. भाषा विज्ञान S-4

मराठा विद्याप्रसारक समाज , नाशिक

# कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी, जि. नाशिक

बी.ए. मराठी

अभ्यासपत्रिका क्रमांक – s-4

भाषाविज्ञान

(दीर्घोत्तरी प्रश्न)

( **कोकणी** बोली)


**प्रा. देविदास गिरी**

उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख

कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी,

जि . नाशिक

प्रश्न. 'कोकणी ही मराठीची बोली आहे'- साधार लिहा.

प्रश्न. कोकणी बोलीचे विशेष स्पष्ट करा.

प्रश्न. कोकणी बोलीचे स्वरूप-विशेष लिहा.

प्रश्न. 'कोकणी ही मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे'- चर्चा करा.

प्रश्न. मराठीच्या प्रमुख बोलींचा थोडक्यात परिचय करून द्या.

प्रश्न. मराठीच्या कोणत्या बोलीसंबंधी वाद आहेत.ते लिहा.

प्रश्न. कोकणी ही मराठीची पोटभाषा की स्वतंत्रभाषा? सप्रमाण चर्चा करा.

उत्तरः- प्रास्ताविकः-सहयाद्री पर्वतामुळे दक्षिण महाराष्ट्रचे देश आणि कोकण असे दोन भाग पडतात. सहयाद्रीच्या पश्चिमेस अरबी समुद्रापासून, दमणपासून गोवा कोचीनपर्यंतची किनारपट्टी आहे तिला कोकण म्हणतात. आणि या किनारपट्टीतील बोलींना कोकणी असे संबोधले जाते. सामान्य पणे दमनपासून रत्नागिरीपर्यंत उत्तर कोकणी व राजापूर ते गोवा कारवारपर्यंत दक्षिण कोकणी असे भाग प्रामुख्याने पडतात.

कोकणी स्वतंत्र भाषा की मराठीची बोली :- कोकणी ही मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे? असा मोठा वादग्रस्त प्रश्न होवून बसला आहे. कोकणी माणसे कोकणी बोलीला स्वतंत्र दर्जा द्यावा. आकाशवाणी, दूरदर्शनवर तिला स्थान मिळवे, साहित्य अकादमीची भारतातील प्रत्येक भाषेला जी पारितोषिके जाहीर होतात, ती कोकणी भाषेलाही मिळावी (आता कोकणी भाषेला देखील साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळतो.) अशा प्रकारचा आग्रह धरतात. तेव्हा कोकणी बोलीचे स्वरूप आणि वैशिष्टये पाहता ती मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे? याही प्रश्नाचा परामर्श घ्यावा लागेल.

कोकणीच्या उपबोलीः- दक्षिण कोकणी व उत्तर कोकणी या दोन प्रमुख भागात विभागल्या गेलेल्या या बोलीच्या आणखीही काही उपबोली आहेत.

i. बाणकोटी ii. घाटी

iii. मावडी iv. संगमेश्वरी

हे कोकणीचे प्रांतानुसार पडणारे भेद आहेत. याशिवाय उच्चवर्णीयांचे भाषा व शेती आणि मासेमारी करणाऱ्यांची भाषा असाही भेद तिच्यामध्ये सापडतो. सारस्वत बोली, हलक्या दर्जाची हिंदुंची बोली, ख्रिश्चनांची बोली असे काही प्रकार सापडतात. पार्तुगीजांच्या भाषेचा जबरदस्त परिणाम कोकणीवर झाल्याकारणाने उच्चार आणि शब्द यादृष्टीने तेथील ख्रिश्चनांची कोकणी आपल्याला सहजासहजी समजत नाही. दक्षिण कोकणी व उत्तर कोकणी यामध्ये उत्तर कोकणचा भाग मुंबई व जवळपासच्या मराठी भाषकांच्या प्रदेशाला लागून असल्याने उत्तर कोकणीत आणि मराठीत फारसा फरक नाही. परंतु दक्षिण कोकणी मात्र मराठीपासून अलग आहे. कारण तिच्यावर पोर्तुगीज व इतर भाषांचा मोठा परिणाम झाला आहे. या दक्षिण कोकणीला 'गोमंतकीय बोली' असेही म्हटले जाते.

<u>कोकणी बोलीचे स्वरूप वैशिष्टये:-</u> या बोलीची वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत:-

१) नासिक्य उच्चांरांचे प्राबल्य या बोलीमध्ये मोंठया प्रमाणात आहेत. किंबहुना तिचे वैशिष्टयच ठरले आहे.

२) श्वासमुक्त व्यंजनातील श्वासाचा उच्चार होत नाही. उदा.

i. घर-गेर

ii. भाऊ-बाव

iii. बहिण-भइण,बोहण.

३) या भाषेत व्यंजनान्त शब्द दिसत नाहीत.

४) या भाषेत 'व' नाहीसा होऊन त्यातील स्वर तेवढा शब्दात शिल्लक राहिल्याचे दिसते.

उदा. विचार-इचार

५) या भाषेतील विभक्ती प्रत्यय :-

| विभक्ती | ए.व. | प्रत्यय | उदाहरण |
|---|---|---|---|
| प्रथमा | - | - | - |
| द्वितीया | क,कां | क,कां | मनुष्याक,मनुष्यांक |
| तृतीया | न,ए,शी | नी,ई,शी | मनुष्यान, मनुष्येइ. |
| चतुर्थी | क,का | क,कां | मनुष्याक,मनुष्यांक |
| पंचमी | - ऊन,थान, च्यान थावन | ऊन,थान, च्यान थावन | मनुष्याऊन,मनुष्याथावन |
| षष्ठी - | चो,ची,चे | चो,ची,चे | मनुष्याची, मनुष्याची |
| सप्तमी - | आं,ई,न्त,र चेर,ग्वेर | आं,ई,न्त,र चेर,ग्वेर | मनुष्यां, मनुष्यान्त मनुष्यांग्वेर |

६) कियांपदांची रूपे-

१) वर्तमानकाळात सर्व पुरूषांत कियापदांची रूपे सारखीच आहेत.

२) भूतकाळात मध्यवर्ती मराठीपगमाणे 'लकार'येतो. उदा.गेला, हसले.

३) काही धातूसाधित नामे पुढीलप्रमाणे- खेळणुं,धावणु इ.

४) अव्यये पुढीलप्रमाणे आहेत-

i. शब्दयोगी-पासीं , खालते

ii. उभयान्वयी अव्यये -जरी,तरी,म्होणू, म्हणूच्याक इ.

iii. कियाविशेषण अव्यय - परां (परवा), खयची (कोठची), थांगा (तिकडे)

७) स्वर वैशिष्टये- कोकणीत अनुस्वाराची लयलूट आहे. मराठीत असे नाही. उदा. चिदंबर, वेकटचलं, इ. कॉलवेलच्या मते 'न' चा लोप होऊन त्याचा अनुस्वार बनला. पालीभाषेत असेच घडते. हाच कोकणी भाषेचा मुळ वारसा असावा.

८) रूंद स्वर अ) शब्दांनी येणाऱ्या ॲ,ऑ या स्वरांना नरसिंग दिवारीया रूंद स्वर म्हणतात. ते बंगाली व कोकणीत फार आहेत. ते कुणबाऊ मराठी समाजात आढळतात उदा. यॅड, तॅल, रॅन, इ.

ब) भांडारकरांनी कापाड, पाताळ, वतान असे दीर्घ शब्द कोकणीचे विशेष सांगितले आहेत. ते संस्कृतमध्ये नाही.

क) कुणबाऊ कानडीत बॅसर, व्यासर, कोणववान असे रूंद स्वर आहेत. म्हणून कोकणीचा हा काही विशेष नसून हे स्वर मूळ द्रविडीतील वा मोंगली भाषेतील असावे ते कोकणीत व कुणबाऊ मराठीत कायम राहिले. नगर मराठीतून व नागर कानडीतून मागाहून ते गेले असावेत असे अनुमान वि.रा.शिंदे यांचे आहे.

९. स्त्रीलिंगी नावाचे अनेकवचन ओकारान्त होते.

उदा. १. राणी - राण्यो २. बाईल - बायलो इ.

१०. कोकणी बोलीची स्वर व व्यंजने मराठी प्रमाणेच आहेत. किंबहुना मराठीला जवळचीच आहेत.

११. कोकणी भाषेतील काही शब्द :-

१. मस्त (सूतार), २. पोख (आगपेटी), ३. चेडॉ (मुलगा,
४ तेल्यान् (पलिकडे), ५. आफवणे (बोलवणे),
६. उखलणे (उचलणे), ७. औथ -औत ८. कुमार (कुंभार),
९. करू (खुण), १०. केस्ताव (भांडण),
११. जायके (जास्त), १२. गण (विद्यार्थी),
१३. धू (मुलगी), १४. चिक (लहान), १५. भिरे (पक्षांचा थवा),
१६. सोलदार (शिपाई), १७. भिकूण (ढेकूण) इत्यादी. बोलीच्या वादाची चर्चाः- कोकणी ही स्वतंत्र भाषा की मराठीची बोली हा वाद बऱ्याच वर्षापासून भिजत पडला आहे. राजकारण, लोकांची भाषेबद्दलची अस्मिता, अभिमान यांतून हा वाद अधुनमधून मोठया प्रमाणात उफाळून

येत असतो. डॉ दलागार यांनी 'कोकणी ही व्याकरणदृष्टया संस्कृतला जवळची आहे व तिचा आणि मराठीचा शाखासंबंध नाही. असे विधान केले व तेव्हापासून या वादाला सुरुवात झाली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मते कोकणी ही सैनिक बोली नसून उपऱ्या समाजाची भाषा असावी डॉ. स.मं. कत्रे 'फॉर्मेशन ऑफ कोकणी' या आपल्या प्रबंधात ' कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे. ' असा सिध्दांत मांडला आहे. तर सर रामकृष्ण भांडारकर, पां. दा.गुणे वगैरे तज्ञांनी कोकणीला मराठीची बोली मानली आहे. अ.का. प्रियोळकरांनी आपल्या 'ग्रांथिक भाषा व कोकणी ' या ग्रथात ' केवळ कोकणी शब्दच नव्हे तर काही वैशिष्टयपूर्ण प्रत्ययही जुन्या मराठीत कसे आढळतात हे दाखवून देऊन कोकणीला स्वतंत्र भाषा मानण्याचे कारणी नाही, असा स्पष्ट निष्कर्ष मांडला आहे. थोडक्यात कोकणीसंबंधी संशोधकांमध्ये, भाषतज्ञामध्ये मतभेद आहेत. एवढा मुद्दा या ठिकाणी स्पष्ट होतो. भाषेचा विज्ञान म्हणून अभ्यास करताना राजकारण, तिची अस्मिता, अभिमान, दुराग्रह हे सर्व बाजूला ठेवून भाषाशास्त्रच्या निकषावर ही मराठीची बोली आहे किंवा नाही? याचा शोध आपण घेतला पाहिजे या वादाचा परामर्श खालील प्रमाणे -

१. एखादी बोली एखाद्या भाषेची बोली आहे किंवा नाही. हे पाहतांना व्याकरणदृष्टया ती त्या भाषेला किती जवळची आहे हे सर्वप्रथम पाहिले पाहिजे व्याकरणाच्या दृष्टीने कोकणी ही मराठीला सर्वात जवळची आहे. मराठी भाषेची वर्णमालाच कोकणी बोली वापरतांना दिसते याशिवाय विभक्ती प्रत्यय इतर व्याकरणीक घटक यामध्ये सुध्दा कोकणी बोलीचे मराठीशी मोठया प्रमाणात साम्य आहे. आणि म्हणून कोकणातील मराठीची बोली मानणे जास्त संयुक्तिक आहे.

२ मराठी भाषिकांना कोकणी लगेच समजते की नाही? हाही एक महत्वाचा निकष आहे. यानुसार मात्र असे म्हणावेसे वाटते की, मराठी भाषकांना

कोकणी फारसी समजत नाही. त्यातल्यात्यात उत्तर कोकणी थोडीशी समजते परंतु दक्षिण कोकणीवर पोर्तुगीज, इंग्रजी, कानडी यांसारख्या भाषांचा मोठा परिणाम झालेला आहे. तरीही मुळात मात्र दक्षिण कोकणीमाध्ये सुध्दा प्राचीन मराठीतले बरेचसे व्याकरणिक घटक आजही सापडतात. यावरून ती मराठीचीच बोली आहे. असे म्हणायला जागा आहे.

३. या सदंर्भात डॉ. प्र.बा वडेर यांनी दिलेली माहिती उल्लेखनीय आहे. ' गोव्यातील ५६ टक्के मुले मराठीतून शिक्षण घेतात, आणि १/२ टक्के हून कमी मुले म्हणजे (४६ शतांश) कोकणी शिकतात. असे गोव्याचे माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांनीच जाहीर केले होते.

४. थोडक्यात गोवा काय किंवा कोकण काय याठिकाणी आजही मराठीचा प्रचार-प्रसार, मराठी भाषकाला एक प्रकारचे मराठी वातावरण पाहावयास मिळते. म्हणजे सांस्कृतिक दृष्टया सुध्दात ते लोक आपल्याला मराठी समाजाचा एक भाग समजतात. कोकणामध्ये आजही गणपती उत्सवासारखे उत्सव की जे मोठया प्रमाणावर साजरे केले जातात. कोकणी लोकांचे आचार-विचार, संस्कृती, सण-समारंभ, धार्मिक गोष्टी इत्यादी बाबतसुध्दा मराठी वातावरणाशी ते जवळचे आहेत. यावरून कोकणीला मराठीची बोली मानण्यास हरकत नसावी.

५. गोव्यातील व कोकणातील लोकांनी आजवर कोकणीचा केवळ दैनंदिन व्यवहारात बोलण्यासाठी वापर केला आहे. परंतु लेखनासाठी मात्र ग्रांथिक मराठीचा, प्रमाण मराठीचाच वापर केलेला आहे. एवढेच काय पाहिली ते बारावी पर्यंतची मराठीची पाठयपुस्तके कोकणात आणि उरलेल्या महाराष्ट्रात सारखीच आहे. हेही लक्षात घेण्यासारखे आहे.

६. अ. का. प्रियोळकर, डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, पां. दा. गुणे, भांडारकर यांसारख्या भाषातज्ञांनी कोकणी ही मराठीचीच बोली असल्याचे आपल्या संशोधनाद्वारे सिध्द केले आहे. हेही महत्वाचे आहे.

७. आज मात्र साहित्य अकादमीने नुकतीच स्वतंत्र भाषा आहे अशी मान्यता दिली आहे. एवढेच नाहीतर आकाशवाणीवर सुध्दा कोकणीचे स्वतंत्र कार्यक्रमसुध्दा होवू लागले आहेत.

समारोप :- शासनाने, राजकारणी लोकांनी काहीही निर्णय घेतले असले तरी कोकणीचा जो मूळ गाभा किंवा आत्मा आहे तो निश्चितपणे मराठीचाच आहे. आणि म्हणून ती मराठीची बोली आहे. फादर स्टीफन्स सारख्या जन्माने इंग्रज असलेल्या लेखकाने 'खिस्तपुराण' हा आपला ग्रंथ मराठीतच लिहिला आहे. बा.भ.बोरकरांसारख्या कवींनी आपले लेखन मराठीतून केले आहे. गोव्यामध्ये व कोकणामध्ये आजही मोठया प्रमाणात मराठी भाषेमध्येच बहुतांशी व्यवहार होतात. या सर्व गोष्टी कोकणी ही स्वतंत्र भाषा नसून मराठीचीच ती बोली आहे. हे सिध्द करण्यास पुरेश आहेत.

**** DNG ****

Last modified: 10:36